

One Day Online National Level Conference in Interdisciplinary subject

# Covid-19 Pandemic and its Impact on Socio - Economic Development in India

Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgaon (Kale), Tq.& Dist. Latur

Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

NAAC Accrediated 'B' Grade

## VASANTRAO KALE MAHAVIDYALAYA,

DHOKI, TQ. & DIST. OSMANABAD. (MS)

Tuesday, 30th June 2020

ISSN 2349-638x
Impact Factor 6.293

Dr. Balasaheb Maind
Editor

Pri. Dr. Haridas Fere
Chief Editor

Organized By

**Department of Economics**

Kisan Shikshan Prasarak Mandal, Borgaon (Kale) Tq. & Dist. Latur

Vasantrao Kale Mahavidyalaya, Dhoki

Tq. & Dist. Osmanabad (MS).

Scanned by CamScanner

4G 4G 12:00 ...
Vo) 1 LTE2 52

Dr Meenakshi J
15 minutes ago




| Sr.No. | Name Of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 36 | डॉ. संदीप गोरख साळवे | उच्च शिक्षालेते समय छात्रों को आने वाली आर्थिक और सामाजिक समस्याओं का अध्ययन | 103 |
| 37 | योगेश्वर साहू | आत्मनिर्भरता : भारत के पुनरुत्थान की योजना | 106 |
| 38 | डॉ.राजकुमार पंडितराव जाधव | कोविड-19 का भारतीय समाज पर पड़ा गहरा प्रभाव | 112 |
| 39 | प्राचार्य डॉ. हरिदास फेरे | कोविड-19 महामारीचे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवरील महासंकट | 114 |
| 40 | प्रा.डॉ.डी. बी. सांदुळजेकर | करोणा विशाणू संकट आणि भारतीय अर्थव्यवस्था | 119 |
| 41 | प्रा, डॉ, गोवर्धन खेडकर | कोरोना विषाणू आणि लॉकडाउन नंतरची भारतीय अर्थव्यवस्था | 122 |
| 42 | डॉ. अर्जुन मोहनराव मोरे | भारतीय कृषी व्यवस्थेवर (Covid 19) कोरोना महामारीचा परिणाम : एक अभ्यास | 124 |
| 43 | प्रा. डॉ. अविनाश विलासराव पवार | कोविड-19 चा भारतीय समाज जीवनावर परिणाम | 129 |
| 44 | प्रा.डॉ. अनंत नरवडे | कोविड-19 चा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 134 |
| 45 | प्रा.डॉ. बी.व्ही. मेंद | आत्मनिर्भर भारत अभियानाची वैशिष्ट्ये | 139 |
| 46 | डॉ. मिनाक्षी भास्कर जाधव | जागतिक महामारीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 144 |
| 47 | डॉ. बालाजी तुळशीराम घुटे | कोव्हीड-19 आणि पर्यावरणीय बदल | 148 |
| 48 | प्रा.डॉ. व्ही.डी. आचार्य | Covid 19 महामारी आणि सरकारची धोरणे : एक राजकीय अभ्यास | 152 |
| 49 | डॉ. शैल्जा माधवराव बरूरे | कोरोना काळातील भारतीय सामाजिक वास्तव | 156 |
| 50 | प्रा. डॉ. बालेश्वर पी. कोकाटे | कोवीड - १९ महामारीचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावरील प्रभाव | 159 |
| 51 | प्रा.आनंद मुसळे | कोविड-19 आणि त्याचा सामाजिक परिणाम | 162 |
| 52 | प्रा.प्रदीप दाजीबा पाटील | कोविड-19 : वास्तव आणि अपेक्षा | 167 |
| 53 | प्रा.डॉ.सुदाम वसंतराव पवार | कोव्हीड-19 आणि शैक्षणिक क्षेत्र | 172 |
| 54 | डॉ.सुधाकर अच्युतराव सांगळे | लॉकडाऊनचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम | 176 |




Scanned by CamScanner

4G 4G 12:02 ···
Dr Meenakshi J
18 minutes ago

# जागतिक महामारीचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**डॉ. मिनाक्षी भास्कर जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद ४१३५०७

**प्रस्तावना :**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे.२०२० साली डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांनी भारत हा महासत्ता होईल असं स्वप्न पाहिल होत. परंतु आज संपूर्ण जग या कोरोनाच्या महामारीत अडकलेल आहे. या महामारीने जगात थैमान घातले आहे. त्यामुळे संपूर्ण जगाने स्वतःला कोंडून घेतले आहे. त्यामुळे याचा परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवर, समाजव्यवस्थेवर, शैक्षणीक व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात होत असताना दिसून येतो.

कोरोना महामारीने अर्थव्यवस्था तर चौपट केली आहेच.सोबत मानवी जीवनावर याचा वाईट परिणाम होत आहे. मानवी मूल्य संकटात आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे या क्रूर विषाणूमुळे जगातील शिक्षण व्यवस्थाही कोलमडून पडली आहे. अध्ययन, अध्यापनाचे कार्य बंद आहे. महाराष्ट्रात जून मध्ये नविन शैक्षणिक सत्राला सुरुवात तर झाली आहे. मात्र शिक्षणाची मंदीरे बंदच आहेत. यावर एकच पर्याय आहे. तो म्हणजे ऑनलाईन शिक्षण.

कोरोनाच्या साथीपुढे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या दिसत आहेत. अगदी सुक्ष्म स्वरूपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या साथीच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी समूहाला जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे. हे अधोरेखीत करायला भाग पाडले आहे.

याच पार्श्वभूमिवर लॉकडाऊन केल्यामुळे जगातील कामगारावर उपासमारीची वेळ आली आहे. कारण हातावर पोट असणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. त्यांच्यावर बेरोजगारीची वेळ आहे.लोकांची कार्यशक्ती कमी झाल्याने मागणीत प्रचंड घट होत आहे. जगातील शेअर मार्केट कोसळल्याने गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान होत आहे.

एवढेच नव्हे तर कोरोना महामारीचा जगाच्या आणि भारताच्या सामाजिक–आर्थिक आणि शैक्षणिक–धार्मिक, राजकीय क्षेत्रावर सुद्धा मोठ्या प्रमाणावर चांगला आणि वाईट परिणाम होत असताना दिसून येत आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे :–**

१) कोरोना महामारीचा समग्र पातळीवर अभ्यास करणे.
२) कोरोना महामारीचा भारताच्या सामाजिक जिवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.
३) कोरोना महामारीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम जाणून घेणे.
४) भारताच्या शिक्षण व्यवस्थेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.



Scanned by CamScanner

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत संशोधन अहवालामध्ये वेगवेगळी तथ्य संकलित करत असताना व त्या तथ्याचे निर्वाचन आणि विश्लेषण वैज्ञानिक पद्धतीने करून निष्कर्ष काढावे लागतात उपरोक्त संशोधन अधिकाधिक वस्तुनिष्ठ बनविण्यासाठी संशोधकाने येथे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

**कोरोना महामारीचा भारताच्या सामाजिक–आर्थिक जीवनावरील परिणाम :–**

आज कोरोना विषाणुमुळे संपूर्ण जग अडचणीत आहे. बहुतांश देशाचे आर्थिक व्यवहार ठप्प झालेले दिसून येत आहेत. कोविड–१९ विषाणूचा मोठ्या प्रमाणावर होणारा संसर्ग रोखण्यासाठी जगामध्ये लॉकडाऊनसारख्या उपयांचा वापर करण्यात येत आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादन, सेवा आणि उद्योग बंद करण्यात आलेले आहेत. जगानं आतापर्यंत दोन महायुद्धे अनुभवलेली होती परंतु या महायुद्धाची झळ काही देशांना लागलीच नव्हती. अर्थात त्यावेळी अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले नव्हते.

आजच्या परिस्थितीचा विचार करता कोरोना विषाणूमुळे मागील महायुद्धापेक्षाही गंभिर परिस्थिती जगामध्ये निर्माण झाली आहे. सर्व शक्तिमान व विकसीत समजल्या जाणाऱ्या अमेरिका आणि युरोपीयन देशांनी या महामारीसमोर हात टेकले आहेत. कोरोनामुळे अर्थव्यवस्थेवर आणि नागरीकांच्या उपजिवीकेवर कोणते दुरगामी परिणाम होतील याचा परीपूर्ण विचार सरकारनं नक्कीच केला असणार आहे. कोरोनामुळे संपूर्ण जग महामंदीत लोटले जात आहे. सद्यस्थितीत सरकारची प्राथमिकता आपल्या नागरिकांना महामारीपासून सुरक्षित ठेवून त्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हीच आहे. यासाठी आरोग्य सेवेवर मोठा निधी खर्च होणे अपेक्षित आहे. देशातील विकास कामे नियोजनाप्रमाणे पूर्ण होणार नाहीत याचा परिणाम रोजगार उपलब्धीवर नक्कीच होणार आहे. आज बहुतांश देशांमध्ये कामगारांना रोजगार मिळणार नाही. काही तज्ञांच्या मते, बेकारीचे प्रमाण सुमारे ३० टक्के पर्यंत जाणार आहे. त्यामुळे उपजीवीकेचा प्रश्न प्रत्येक देशामध्ये निर्माण होणार आहे.

जग जेव्हा महामारीच्या संकटातून बाहेर येईल. तेव्हा विविध आव्हाने समोर उभी राहिलेली आपणास दिसून येतील. प्रथमत: उद्योजकांना भांडवलाची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवेल. याशिवाय व्यावसायाचे खर्च उदा. कर्जावरील व्याज, भाडे, पगार व इतर खर्च टाळेबंदी काळामध्ये अदा करावेच लागणार आहेत. याचा परिणाम व्यवसायाच्या आर्थिक नियोजनावर झाल्याशिवाय राहणार नाही. सरकारकडे उत्पन्न कमी झाल्यामुळे भविष्यात नागरीकांवर मोठ्या प्रमाणावर कर लादून वसूली करणे सरकारला शक्य होणार नाही. चालू आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष कर संकलनामध्ये १.४४ लाख करोड(ट्रिलीयन) रुपयांची तूट पडली आहे. याशिवाय जीएसटी कर संकलनामध्ये मोठी तुट दिसून येत आहे. मार्च २०२० या महिन्याचे नियोजीत कर संकलन १.२५ लाख करोड होते. परंतु प्रत्यक्ष ०.९८ लाख करोड संकलन झाले. फेब्रूवारी २०२० अखेर पर्यंत जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वित्तिय तूट ३ टक्के वरून ५ टक्के पर्यंत वाढली आहे.

देशातील टाळेबंदीचा विविध उद्योगावर मोठ्या प्रमाणावर वाईट परिणाम होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने बांधकाम व्यवसाय, पर्यटन उद्योग, वाहन उद्योग, वित्तिय संस्था, हॉटेल उद्योग, वाहतूक उद्योग, इत्यादी सर्व व्यवसायावर अवलंबून असणारे इतर छोटे–मोठे उद्योग व सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होणार आहे.

Scanned by CamScanner

भारतासारख्या लोकशाही प्रधान देशाने सुरूवात केल्याचे दिसून येत आहे. यामुळे देशातील छोट्या-मोठ्या उद्योगांना चांगल्या संधी उपलब्ध होतील तसेच कुशल व अकुशल कामगारांना रोजगार उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे. यासाठी सरकारने उद्योगधंद्याच्या वाढीसाठी तसेच परकिय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी योग्य ते पोषक वातावरण तयार करणे गरजेचे आहे. त्यासाठी आर्थिक व तांत्रिक पाठबळ देणे गरजेचे आहे. त्यामुळे भारत उत्पादन क्षेत्रातील एक मोठे केंद्र म्हणून उदयास येईल. यामुळे आपली निर्यात क्षमता वाढून भारत एक महासत्ता बनण्यास वेळ लागणार नाही.

कोरोना महामारीचा जसा देशाच्या सामाजिक-आर्थिक जीवनावर परिणाम झालेला आहे. तसाच त्याची सर्वात मोठी झळ शैक्षणिक क्षेत्राला बसली आहे. भारतीय परंपरेनुसार समानता, बंधुता, स्वातंत्र्यता, यासारखी मूल्ये विद्यार्थ्यात रूजवून त्याच्या व्यक्तीमत्याचा विकास करणे त्यांना भविष्यातील जबाबदार नागरिक बनवणे, चारित्र्यसंपन्न बनवणे सोबतच त्यांच्या ज्ञानाचा उत्तरोउत्तर विकास करणे हा शिक्षणाचा मूळ उद्देश असला पाहिजे. हा उद्देश शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या संबंधातून साध्य होतो. हजारो वर्षापासून वर्गात चालणाऱ्या अध्ययन अध्यापनाचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञानाचे डोस पाजणे हा राहिलेला नाही. वर्गातील शिक्षणात असणारी गुरू-शिष्य परंपरेत एक वेगळाच आनंद असतो. सध्या ऑनलाईन शिक्षण पद्धती मात्र हे वरील सर्व उद्देश पूर्ण करण्यात अयशस्वी ठरलेली दिसून येत आहे. शिक्षण पद्धतीचा मूळ उद्देश बाजूला राहिलेला दिसून येत आहे.

**निष्कर्ष :-**

१) जागतीक महामारीचा देशातील सामाजिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

२) जागतीक महामारीचा देशातील आर्थिक परिस्थितीवरही विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

३) कोरोना महामारीमुळे शैक्षणीक क्षेत्रावर देखील मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम दिसून येतो. लहान मुलांच्या आरोग्यावर ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा प्रतिकूल परिणाम पहावयास मिळतो.

४) देशातील बहुतांश कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळलेली दिसून येते. त्यांच्यापुढे उदरनिर्वाह कसा करायचा हाच मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे.

५) कोरोना महामारीचा एक अनुकूल परिणाम म्हणजे प्रदुषण कमी झाले आहे. त्यामुळे यावर्षी जून महिन्यात सुरूवातीलाच मोठ्या प्रमाणावर पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. त्यामुळे जगाचा पोशिंदा हा आनंदात पहायला मिळतो.

**सारांश :-**

कोरोना महामारीमध्ये संपूर्ण जग अडकलेलं आहे. त्याचा मानवतेच्या जीवनावर खूप घातक परिणाम होत असताना दिसून येतो. म्हणजेच देशातील सामाजिक, आर्थीक शैक्षणीक, धार्मिक, राजकीय इत्यादी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. तरी सुद्धा मानवाने खचून न जाता कोरोनाला न भिता अगदी धीटपणे समोर गेलं पाहिजे काळजी करण्यापेक्षा काळजी घेतली पाहिजे. हे ही दिवस जातील आणि



Scanned by CamScanner

उद्याची सुंदर पहाट नवी आशा, नवी स्वप्न घेऊन उंच भरारी नक्कीच घेऊ यात आणि सर्व नियम पाळूयात आणि कोरोनाला हद्दपार करु एवढी शक्ती प्रत्येक व्यक्तीमध्ये असायला पाहिजे. तरच डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांनी पाहिलेलं स्वप्न 'भारत महासत्ता' हे पूर्ण होईल.

**संदर्भ ग्रंथाची यादी**

१) २० मार्च २०२० मराठवाडा साथी वृत्तपत्र
२) २१ मार्च २०२० मराठवाडा साथी वृत्तपत्र
३) ६ एप्रिल २०२० लोकाशा
४) १६ एप्रिल २०२० लोकाशा
५) १९ मे २०२० लोकसत्ता विचार
६) १२ २६ मे २०२० हदगाव एक्सप्रेस

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

Scanned by CamScanner